## कार्यकारी सारांश

### १.१ प्रस्तावना

१.१.१ या विभागामध्ये जयगड पॉवरट्रान्सको लिमिटेड (जेपीटीएल) यांच्या एमवायटी अधिनियम २०१५ नुसार वित्तीय वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन (ट्रू-अप), एमवायटी अधिनियम, २०१९ नुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ चे अचूक समायोजन, वित्तीय वर्ष २०२२-२३ चे तात्पुरते अचूक समायोजन आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ व वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीचा मध्य मुदतीच्या कामगिरीचा आढावा (एमटीआर) यासाठीच्या याचिकेचा सारांश आहे.

### १.२ वित्तीय वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजन

**१.२.१** जेपीटीएल यांनी वित्तीय वर्ष २०१९-२० च्या अचूक समायोजनासाठी आपल्या वार्षिक महसूल आवश्यकतेची (एआरआर) गणना केली आहे ज्यात त्यांनी वित्तीय वर्ष २०१९-२० च्या लेखापरीक्षित लेख्यांवर आधारित प्रत्यक्ष खर्च मांडले आहेत आणि एमईआरसी (बहु वर्ष दर) अधिनियम, २०१५ नुसार जेथे लागू असतील तेथे त्या नियमांचे पालन केले आहेत.

**१.२.२** सन्माननीय आयोगाने प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ मध्ये दिलेल्या ३० मार्च २०२० दिनांकित एमवायटी आदेशानुसार मंजूर केलेल्या खर्चांशी, जर काही विचलन असल्यास त्यांसह, खर्चाच्या विविध घटकांची तपशीलवार तुलना वित्तीय वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन या प्रकरणात सादर केली आहे. मंजूर एआरआर सह वित्तीय वर्ष २०१९-२० च्या अचूक समायोजनाचा सारांश खाली सादर केला आहे:

**कोष्टक १: वित्तीय वर्ष २०१९-२० साठीच्या अचूक समायोजनासाठी वार्षिक महसूल आवश्यकता (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन |
|---|---|---|---|---|
| प्रचालन व सुव्यवस्थेवरील खर्च | ५.०२ | ४.६५ | ४.७७ | (०.२५) |
| घसारा | २९.११ | २९.१० | २९.१० | (०.०१) |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १६.९० | १६.७६ | १६.७६ | (०.१३) |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १.५२ | १.५४ | ०.५१ | (१.०१) |
| आयकर खर्च | ६.०९ | ५.९७ | ५.९७ | (०.१२) |
| आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीसाठी अंशदान | १.३८ | १.३८ | १.३८ | 0.00 |
| एकूण महसुली खर्च | ६०.०१ | ५९.४० | ५८.५० | **(१.५१)** |

| तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवलावरील परतावा | २१.४६ | २१.४६ | २१.४६ | (0.00) |
| एकत्रित महसूल आवश्यकता | ८१.४६ | ८०.८६ | ७९.९६ | **(१.५१)** |
| वजा: दराव्यतिरिक्तचे / नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.९१ | ०.९१ | ०.९१ | (0.00) |
| अधिक: प्रोत्साहन | ०.०० | ०.४६ | ०.४६ | ०.४६ |
| एकूण वार्षिक महसूल आवश्यकता | ८०.५६ | ८०.४१ | ७९.५१ | **(१.०५)** |

**१.२.३** पुढे, वित्तीय वर्ष २०१९-२० साठी प्रकरण क्र. १६७ वर्ष २०१७ दिनांकित १२ सप्टेंबर २०१८ आणि प्रकरण क्र. २६५ वर्ष २०१८ मधील १२ सप्टेंबर २०१८ दिनांकित आदेशानुसार केलेल्या राज्यांतर्गत पारेषण दर सुधारणेनुसार पारेषण दराच्या माध्यमातून वसूल करण्याची परवानगी असलेला एआरआर (महसूल) रु. ८०.०७ कोटी आहे.

**१.२.४** वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये वसूल झालेला महसूल आणि अचूक समायोजनासाठी गणना केलेला एआरआर विचारात घेता, परिणामी महसूल अधिक्य पुढीलप्रमाणे आहे:

**कोष्टक २: वित्तीय वर्ष २०१९-२० साठी महसूल तफावत/ (अधिक्य) (रु. कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २०१९-२० |
|---|---|---|
| १ | एकूण एआरआर | ७९.५१ |
| २ | पारेषण दरांमधून सवलत समायोजनेनंतर वसूल वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) | ७९.९७ |
| **३** | **महसूल तफावत / (अधिक्य)** | **(०.४६)** |

**१.३ वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ साठीचे अचूक समायोजन**

**१.३.१** जेपीटीएल यांनी वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या अचूक समायोजनासाठी आपल्या वार्षिक महसूल आवश्यकतेची (एआरआर) गणना केली आहे ज्यात त्यांनी संबंधित वर्षांचे म्हणजेच वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षित लेख्यांवर आधारित प्रत्यक्ष खर्च मांडले आहेत आणि एमईआरसी (बहु वर्ष दर नियंत्रण) अधिनियम, २०१९ नुसार जेथे लागू असतील तेथे त्या नियमांचे पालन केले आहेत.

**१.३.२** सन्माननीय आयोगाने प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ मध्ये दिलेल्या ३० मार्च २०२० दिनांकित एमवायटी आदेशानुसार मंजूर केलेल्या खर्चांशी, जर काही विचलन असल्यास त्यांसह, खर्चाच्या विविध घटकांची तपशीलवार तुलना वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ चे अचूक समायोजन या प्रकरणात सादर केली आहे.

**१.३.३** याशिवाय, पुढे चालत आलेल्या खर्चांसह मागील तफावत, जी प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ मध्ये मंजूर केल्यानुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये वसुलीची परवानगी होती, ती अचूक समायोजनासाठी वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या एकूण एआरआरमध्ये समाविष्ट केली आहे.

**१.३.४** मंजूर एआरआर सह वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या अचूक समायोजनाचा सारांश खाली सादर केला आहे:

**कोष्टक ३: वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ साठीच्या अचूक समायोजनासाठी वार्षिक महसूल आवश्यकता (रु. कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वित्तीय वर्ष २०२०-२१ | | | | वित्तीय वर्ष २०२१-२२ | | | |
| १ | प्रचालन व सुव्यवस्थेवरील खर्च | ४.५३ | ४.४६ | ४.४९ | -०.०५ | ४.६९ | ४.४३ | ४.५१ | -०.१७ |
| २. | अतिरिक्त प्रचालन खर्च | - | ०.२० | ०.२० | ०.२० | - | ०.२० | ०.२० | ०.२० |
| ३. | घसारा | २९.१४ | २९.१२ | २९.१२ | -०.०२ | २९.१९ | २९.१३ | २९.१३ | -०.०६ |
| ४. | कर्जावरील व्याज | १४.२७ | १३.५१ | १३.५१ | -०.७६ | ११.६३ | १०.२४ | १०.२४ | -१.३९ |
| ५. | खेळत्या भांडवलावरील व्याज | १.३५ | १.२१ | ०.४८ | -०.८७ | १.४१ | १.२६ | १.१३ | -०.२८ |
| ६. | आकस्मिक खर्चांसाठी राखीव निधीसाठी अंशदान | १.३८ | १.३८ | १.३८ | ०.०० | १.३९ | १.३८ | १.३८ | -०.०१ |
| ७. | एकूण महसुली खर्च | ५०.६७ | ४९.६८ | ४९.०३ | -१.६३ | ४८.३० | ४६.६३ | ४६.६० | -१.७० |

| अनु. क्र. | तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **वित्तीय वर्ष २०२०-२१** | | | | **वित्तीय वर्ष** २०२१-२२ | | | |
| ८. | भाग भांडवलावरील परतावा | २३.५६ | २६.०७ | २६.०७ | २.५० | २३.६३ | २५.४१ | २५.४१ | १.७८ |
| ९ | एकत्रित महसूल आवश्यकता | ७४.२३ | ७५.७५ | ७५.१० | ०.८७ | ७१.९२ | ७२.०४ | ७२.०० | ०.०८ |
| १० | वजा: दराव्यतिरिक्तचे / नॉन टॅरिफ उत्पन्न | १.०१ | १.०१ | १.०१ | ०.०० | १.१२ | १.१० | १.१० | -०.०२ |
| ११ | एकूण वार्षिक महसूल आवश्यकता/ एआरआर | ७३.२१ | ७४.७४ | ७४.१० | ०.८७ | ७०.८० | ७०.९४ | ७०.९१ | ०.१० |
| १२ | अधिक: प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ च्या वित्तीय वर्ष २०१७-१८ साठी तफावत/ (अधिक्य) | ०.७७ | ०.७७ | ०.७७ | (०.००) | | | | |
| १३ | अधिक: प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ च्या वित्तीय वर्ष २०१८-१९ साठी तफावत/ (अधिक्य) | (७.०४) | (५.०९) | (५.०९) | १.९५ | | | | |
| १४ | अधिक: प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ च्या वित्तीय वर्ष २०१९-२० साठी तफावत/ (अधिक्य) | ०.४९ | - | - | (०.४९) | | | | |
| १५ | प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ मधील मंजूर पुढे चालत आलेले मूल्य/ (धारण मूल्य) | (१.४१) | (०.६५) | (०.६५) | ०.७६ | | | | |

| अनु. क्र. | तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन | मंजूर | प्रत्यक्ष | नफा/ (तोटा) वाटल्यानंतर निव्वळ हक्क | विचलन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वित्तीय वर्ष २०२०-२१ | | | | वित्तीय वर्ष २०२१-२२ | | | |
| १६ | मागील तफावत धरून एकूण वार्षिक महसूलाची आवश्यकता (एआरआर) | ६६.०२ | ६९.७७ | ६९.१२ | ३.०९ | ७०.८० | ७०.९४ | ७०.९१ | ०.१० |

**१.३.५** पुढे, वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ साठी प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ दिनांकित ३० मार्च २०२० आणि प्रकरण क्र. ३२७ वर्ष २०१९ दिनांकित ३० मार्च २०२० नुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीच्या ४ थ्या एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या पारेषण दरांनुसार पारेषण दरांच्या माध्यमातून वसूल करण्याची परवानगी असलेला एआरआर (महसूल) महसूल तफावतीची गणना करण्यासाठी विचारात घेतला आहे.

**१.३.६** मागील तफावती व वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये वसूल झालेला महसूल विचारात घेऊन जेपीटीएल यांनी दावा केलेली महसूल तफावत खालीलप्रमाणे आहे आणि पुढे चालत आलेल्या खर्चासह त्याला परवानगी द्यावी अशी माननीय आयोगाला विनंती आहे.

**कोष्टक ४: वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ साठी महसूल तफावत (रु. कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २०२०-२१ | वित्तीय वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १ | एकूण एआरआर | ६९.१२ | ७०.९१ |
| २ | पारेषण दरांमधून सवलत समायोजनेनंतर वसूल वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) | ६५.९४ | ७०.७१ |
| ३ | महसूल तफावत | ३.१८ | ०.१९ |

**१.४ वित्तीय वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन**

**१.४.१** एमईआरसी (बहु वर्ष दर) अधिनियम, २०१९ नुसार जेपीटीएलच्या वित्तीय वर्ष २०२२-२३ साठीच्या वार्षिक महसूल आवश्यकतेचा सारांश एच१ (एप्रिल-२०२२ ते सप्टेंबर २०२२) आणि एच२ (ऑक्टोबर २०२२ ते मार्च २०२३ साठी अंदाजित) अशा दोन भागांमध्ये खालील कोष्टकात नमूद केला आहे:

**कोष्टक ५: वित्तीय वर्ष २०२२-२३ साठी एकत्रित महसूल आवश्यकता (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | मंजूर | प्रत्यक्ष एच१ | अंदाजित एच२ | अंदाजित |
|---|---|---|---|---|
| प्रचालन व सुव्यवस्थेवरील खर्च | ४.८७ | २.२३ | २.६४ | ४.८७ |
| अतिरिक्त प्रचालन खर्च | - | ०.२४ | ०.२७ | ०.५१ |
| घसारा | २९.१८ | १४.५७ | १४.६५ | २९.२२ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ८.९० | ३.९५ | ३.९५ | ७.९० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १.३८ | ०.६८ | ०.६८ | १.३७ |
| आयकर | | | | |
| आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीसाठी अंशदान | १.३९ | ०.६९ | ०.६९ | १.३८ |
| एकूण महसुली खर्च | ४५.७२ | २२.३६ | २२.८९ | ४५.२६ |
| भाग भांडवलावरील परतावा | २३.६३ | ११.८१ | ११.८१ | २३.६२ |
| एकत्रित महसूल आवश्यकता | ६९.३५ | ३४.१८ | ३४.७१ | ६८.८८ |
| वजा: दराव्यतिरिक्तचे / नॉन टॅरिफ उत्पन्न | १.२३ | ०.५७ | ०.६२ | १.१९ |
| एकूण एकत्रित महसूल आवश्यकता | ६८.१२ | ३३.६० | ३४.०८ | ६७.६९ |

**१.४.२** वित्तीय वर्ष २०२२-२३ साठी प्रकरण क्र. २९४ वर्ष २०१९ दिनांकित ३० मार्च २०२० आणि प्रकरण क्र. ३२७ वर्ष २०१९ दिनांकित ३० मार्च २०२० नुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीच्या ४ थ्या एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या पारेषण दरांनुसार पारेषण दरांच्या माध्यमातून वसूल करण्याची परवानगी असलेला एआरआर (महसूल) रु. ६८.१२ कोटी इतका आहे.

**१.४.३** त्यानुसार, वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या तात्पुरत्या अचूक समायोजनासाठी जेपीटीएलद्वारे प्रस्तावित सुधारित एआरआर आणि वसूल करावयाचा मंजूर एआरआर यांवर आधारित, जेपीटीएल खालीलप्रमाणे परिणामी तफावत/ (अधिक्य) याद्वारे सादर करत आहे:

**कोष्टक ६: वित्तीय वर्ष २०२२-२३ साठी महसूल तफावत/ (अधिक्य)**

| तपशील | वित्तीय वर्ष २०२२-२३ |
|---|---|
| एकूण एआरआर | ६७.६९ |
| पारेषण दरांमधून वसूल वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) | ६८.१२ |
| महसूल तफावत / (अधिक्य) | **(०.४३)** |

**१.५ वित्तीय वर्ष २०२३-२४ व वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी मध्य मुदतीच्या कामगिरीचा आढावा**

१.५.१ एमईआरसी (बहु वर्ष दर) अधिनियम, २०१९ नुसार जेपीटीएलच्या वित्तीय वर्ष २०२३-२४ व वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीच्या वार्षिक महसूल आवश्यकतेचा सारांश खालील कोष्टकात नमूद केलेला आहे:

**कोष्टक ७: एमवायटी नियंत्रण कालावधी - वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी एकत्रित महसूल आवश्यकता**

**(रु. कोटींमध्ये)**

| तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | मंजूर | प्रत्यक्ष |
|---|---|---|---|---|
| | वित्तीय वर्ष २०२३-२४ | | वित्तीय वर्ष २०२४-२५ | |
| प्रचालन व सुव्यवस्थेवरील खर्च | ५.०७ | ५.६७ | ५.२७ | ५.२७ |
| घसारा | २९.१९ | २९.४५ | २९.१८ | २९.७० |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ६.१७ | ५.७९ | ३.४५ | ३.६५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १.३५ | १.३९ | १.३२ | १.३३ |
| आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीसाठी अंशदान | १.३९ | १.३९ | १.३९ | १.४१ |
| एकूण महसुली खर्च | ४३.१७ | ४३.६८ | ४०.६० | ४१.३५ |
| भाग भांडवलावरील परतावा | २३.६३ | २३.८९ | २३.६३ | २४.१५ |
| एकत्रित महसुलाची आवश्यकता | ६६.८० | ६७.५८ | ६४.२३ | ६५.५० |

| तपशील | मंजूर | प्रत्यक्ष | मंजूर | प्रत्यक्ष |
|---|---|---|---|---|
| | वित्तीय वर्ष २०२३-२४ | | वित्तीय वर्ष २०२४-२५ | |
| वजा: दराव्यतिरिक्तचे / नॉन टॅरिफ उत्पन्न | १.३३ | १.३० | १.४४ | १.४० |
| एकत्रित महसूलाची आवश्यकता | ६५.४६ | ६६.२८ | ६२.७९ | ६४.१० |
| अधिक: वित्तीय वर्ष २०१९-२० च्या अचूक समायोजनासाठी तफावत/ (अधिक्य) | | (०.४६) | | |
| अधिक: वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या अचूक समायोजनासाठी तफावत/ (अधिक्य) | | ३.१८ | | |
| अधिक: वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या अचूक समायोजनासाठी तफावत/ (अधिक्य) | | ०.१९ | | |
| अधिक: वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या तात्पुरत्या अचूक समायोजनासाठी तफावत/ (अधिक्य) | | (०.४३) | | |
| वित्तीय वर्ष २०१९-२० ते वित्तीय वर्ष २०२१-२२ साठी पुढे चालत आलेले मूल्य/ (धारण मूल्य) | | ०.२७ | | |
| मागील तफावत धरून एकूण वार्षिक महसूलाची आवश्यकता | ६५.४६ | ६९.०३ | ६२.७९ | ६४.१० |

**१.६ सन्माननीय आयोगाला विनंती:**

१.६.१ अर्जदार याद्वारे विनयपूर्वक सुधारित याचिका सादर करत आहे आणि सन्माननीय आयोगास विनंती करत आहे की त्यांनी कृपया:

क) एमवायटी अधिनियम २०१५ नुसार वित्तीय वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन (ट्रू-अप), एमवायटी अधिनियम, २०१९ नुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ चे अचूक समायोजन, वित्तीय वर्ष २०२२-२३ चे तात्पुरते अचूक समायोजन आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ व वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीचा मध्य मुदतीच्या कामगिरीचा आढावा (एमटीआर) यांच्या मंजुरीसाठी केलेली याचिका दाखल करून घ्यावी;

ख) मागील तफावती व एमवायटी अधिनियम २०१५ नुसार वित्तीय वर्ष २०१९-२० साठी अधिक पारेषण उपलब्धता यासाठीचे प्रोत्साहन यांसह जेपीटीएल यांच्या एआरआरचे अचूक समायोजन मंजूर करावे;

ग) एमवायटी अधिनियम २०१९ नुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ व वित्तीय वर्ष २०२१-२२ साठी अधिक पारेषण उपलब्धता यासाठीच्या कामगिरीवर आधारित आरओई सह जेपीटीएल यांच्या एआरआरचे अचूक समायोजन मंजूर करावे;

घ) एमवायटी अधिनियम २०१९ नुसार सदर याचिकेत सादरीकरण केलेल्या जेपीटीएल यांच्या आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या एआरआरचे तात्पुरते अचूक समायोजन मंजूर करावे;

च) एमवायटी अधिनियम २०१९ नुसार वित्तीय वर्ष २०२३-२४ व वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीची सुधारित वार्षिक महसूल आवश्यकता मंजूर करावी;

छ) मानक प्रचालन व सुव्यवस्था खर्चाबरोबरच एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी दुरुस्ती खर्च व पारेषण यंत्रणेसाठी अतिरिक्त प्रचालन खर्च यास परवानगी द्यावी;

ज) वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या अचूक समायोजनाच्या वेळेस पारेषण मत्तांच्या नवीन विमा पॉलिसीच्या खर्चाचा दावा करण्याची परवानगी द्यावी;

झ) वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी जेपीटीएल द्वारे प्रस्तावित केलेल्या अतिरिक्त भांडवलीकरणास परवानगी द्यावी;

ट) याचिकेत सादर केलेल्या पारेषण आकारातील मागील तफावती भरून काढण्यास परवानगी द्यावी;

ठ) अनवधानाने झालेल्या कोणत्याही चुका, त्रुटी व काही वगळले गेल्यास त्यासाठी क्षमा करावी आणि जेपीटीएल यांना या सादरीकरणात काही भर / बदल/ सुधारणा करण्याची आणि गरजेनुसार पुढील तारखेस पुढील सादरीकरण करण्याची परवानगी द्यावी; आणि

ड) सदर प्रकरणातील तथ्ये व परिस्थितीनुसार आपल्याला योग्य व उचित वाटतील असे कोणतेही अन्य आणि पुढील आदेश द्यावेत;